रविवार
१९
एप्रिल २०२६

वर्ष १९ वे
अंक - ९५
पाने - ०६
किंमत - ०४ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com


# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता


संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25


अक्षय तृतीयेच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !








दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ९५ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प्र.) रविवार । १९/०४/२०२६ । पान -२




# भोंदू गडगे गजाआड; नरबळी, जादुटोणाचे कलम

## अंनिसच्या फिर्यादीवरून गुन्हा, आश्रमात वीजचोरी - २० लाखांचा दंड; तपासात येणार धक्कादायक खुलासे


दैनिक युवावार्ता
संगमनेरात 'भोंदू बाबा'चे वाढते प्रस्थ; वडगावची आख्यायिका राज्यभर
विकृत घटनांनंतरही भक्तांचे उघडेना डोळे
सोशल मीडियातून 'चमत्कारांची' विक्री
नागरिकांना दैनिक युवावार्ताचे जाहीर आवाहन





दैनिक युवावार्तानेे या भोंदू बाबाविरोधात सर्वात प्रथम आवाज उठवला होता. दिनांक २९ मार्च २०२६ रोजी याविषयी सविस्तर बातमी प्रकाशित केली होती.

**भोंदूंनो आता तरी थांबा**

ऐसे कैसे झाले भोंदू । कर्म करोनि म्हणती साधू ।।१।।
अंगा लावूनियां राख । डोळे झांकुनी करिती पाप ।।२।।
दावुनि वैराग्याची कळा । भोगी विषयांचा सोहळा ।।३।।
तुका म्हणे सांगों किती । जळो तयांसी संगती ।।४।।
- संत तुकाराम महाराज


AI GENERATED IMAGE

## भोंदू गडगेने फोनवरून दिली युवावार्ताला बदनामीचा दावा दाखल करण्याची धमकी

**भोंदू गडगे विरूध्द दैनिक युवावार्ताने बातमी प्रसिध्द केल्यानंतर रात्री ७२१९३०३६८३ या मोबाईल क्रमांकावरून संपादक किसन भाऊ हासे यांना रात्री ९.३० वाजता फोन आला होता. हॅलो मी आश्रमातून बोलत आहे. तुम्ही आश्रमाबद्दल चुकीची माहिती छापली आहे. त्यानंतर भोंदू गडगे याने फोनवर येत तुम्ही असे कसे काय छापू शकता, तुम्ही महाराजांना ओळखता का? असे विचारले. त्यावर संपादकांनी सांगितले मी तुला महाराज नाही गडगेच म्हणणार आणि तुला जे काही बोलायचे असेल ते सकाळी १० वाजता बोलावे असे सांगितले. त्यावर गडगे आग्रहाने म्हटला की, तुम्हाला जाहिरात पाहिजे का? त्यास नाही असे उत्तर देताच त्याने तुम्ही आमची बदनामी करता. आम्ही तुमच्यावर मानहानीचा दावा करणार असल्याची धमकी दिली.**

युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिकमधील 'खरात बाबा' प्रकरणाने राज्य हादरले असतानाच, संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथे स्वतःला दैवी शक्ती असल्याचा दावा करत कॅन्सरसारखे दुर्धर आजार मंत्राने बरे करतो, मुल नसणाऱ्या महिलांना मुल देतो, घरातील सर्व समस्यांचा निपटारा करतो, ओम शिव... म्हणत पैसे घेऊन अनेक समस्या सोडविण्याचा दावा करणाऱ्या भोंदू 'गडगे बाबा' उर्फ राजेंद्र बापू गडगे याचा पर्दाफाश झाला असून त्याच्यासह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुका पोलिसांनी राजेंद्र गडगे आणि मधुकर शिंदे यांना अटक केली असून उर्वरित तिघांचा शोध सुरू आहे.

तालुका पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजेंद्र गडगे याने 'दत्तधाम सरकार' नावाने यूट्यूब चॅनल सुरू करून कर्करोगासारखे दुर्धर आजार मंत्रशक्तीने बरे करणे, निःसंतान महिलांना मूल प्राप्त करून देणे, तसेच विविध कौटुंबिक समस्या सोडवण्याचे खोटे दावे करत नागरिकांची दिशाभूल केली. या दाव्यांवर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांकडून ११ हजार ते ५१ हजार रुपयांपर्यंत रक्कम उकळल्याचे तपासात समोर आले आहे. इतकेच नव्हे तर, दैवी शक्ती असल्याचा आव आणून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण करण्यात आले. विविध आजारांवर उपचाराच्या नावाखाली पालापाचोळ्याचे औषध देऊन मोठ्या प्रमाणात पैसे उकळले जात होते. या औषधांमुळे अनेकांना शारीरिक त्रास सहन करावा लागल्याची धक्कादायक माहितीही पुढे आली आहे. गेल्या दहा वर्षांपासून गरजू आणि अडचणीत सापडलेल्या नागरिकांचे आर्थिक, मानसिक आणि शारीरिक शोषण केल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. यात तथाकथित या भोंदू बाबा विरूद्ध अनेक तक्रारी पुढे आल्यानंतर याबात अंधश्रद्धा निर्मुलन समितीने त्याच्यावर कारवाई करावी यासाठी मोहिम छेडली. प्रांताधिकाऱ्यांना, पोलीसांना निवेदन दिले. त्यामुळे भोंदू बाबा आणि अंनिस यांच्यात संघर्ष निर्माण झाला. त्यातून १२ एप्रिल रोजी अंनिसच्या राज्य सचिव अॅड. रंजना गवांदे यांना बाबाचे सहकारी मधुकर शिंदे, डॉ. मोहन पुरी, ज्ञानेश्वरी गडगे यांनी वारंवार फोन करून आपण मिटींग करू असे सांगितले. ज्ञानेश्वरी गडगे यांच्यासह या लोकांनी गवांदे यांच्या घरासमोर उभे राहून त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. मात्र अॅड. रंजना गवांदे यांनी याबाबत पोलीसांना माहिती देऊन त्यांना पिटाळून लावले. अॅड. गवांदे व अंनिस या कोणत्याही प्रकारे दाद देत नसल्याने या भोंदूने तंत्रज्ञानाचा वापर करत बोगस व्हिडीओ तयार केला. त्यात अंनिस, पोलीस आपल्याकडे खंडणीद्वारे लाखो रूपयांची मागणी करत असल्याचा दावा केला. आणि हा व्हिडीओ सोशल माध्यमांवर पसरवून अॅड. गवांदे व अंनिसची बदनामी केली. महिला, नागरीक यांच्या अज्ञान व अडचणींचा गैरफायदा घेत या भोंदूबाबाने नागरीकांची प्रचंड आर्थिक लुट करून मानसिक छळ केला. त्याच्या मंत्रातून कोणताही फरक पडला नसतांना देखील पुढील उपचार म्हणून मोठी रक्कम उकाळण्यात आली. त्याच्याच युट्यूबच्या माध्यमातून अजब दाव्यांचे गजब व्हिडीओ प्रसारीत करून गरजूंना त्याच्याकडे अकर्षित केले. आणि हा दत्तधामचा दरबार मोठ्या प्रमाणावर विस्तारला. मात्र खरात प्रकरणानंतर आणि या भोंदूच्या काही कारणाम्यानंतर हळूहळू त्याचे पितळ उघडे पडू लागले. त्यातच अंधश्रद्धा निर्मुलन समितीने यात लक्ष घातल्याने बाबाचा हा विस्तरलेला बाजार अखेर उठला. मात्र स्वत:चे पाप झाकण्यासाठी त्याने अंनिसवर गंभीर आरोप केले. आणि त्यामुळे या प्रकरणी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य सचिव तथा वकील रंजना गवांदे यांच्या फिर्यादीवरून राजेंद्र गडगे, डॉ. मोहन पुरी, ज्ञानेश्वरी गडगे (रा. वडगावपान) तसेच सुरज शिंदे व मधुकर शिंदे (रा. रहीमपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे करत आहेत.

**वीजचोरीचाही भांडाफोड -** भोंदू गडगे हा केवळ भक्तांचीच लुट करीत नव्हता तर कही शासकीय अधिकाऱ्यांना हताशी धरून सरकारचीही लुट करीत होता. वडगाव पानमध्ये केलेले अवैध बांधकामे, कोणतेही परवाने नसतांना सुरू केलेले हॉटेल, मेडीकल आणि आश्रमासाठी लागणारी वीज देखील त्याने फुकटात घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी महावितरणच्या पथकाने तपासणी केली असता आश्रमात वीजमीटर बायपास करून अनधिकृतपणे वीज वापर होत असल्याचे आढळले. या वीजचोरीद्वारे एअर कंडिशनर, बोअरवेल आणि लाइटिंगसह सुमारे ७ किलोवॅट भार वापरला जात होता. याप्रकरणी महावितरण कंपनीने या दत्तधाम आश्रमावर २० लाख रूपयांचा दंड ठोठावला आहे. संबंधित मीटर बंद करण्यात आले असून दोषींना बिल भरण्यासाठी सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे. ही वीज चोरी किती दिवसांपासून सुरू होती याची माहिती काढण्याचे काम सुरू असल्याचे कार्यकारी अभियंता प्रदिप वट्टमवार यांनी सांगितले.

**'खरात बाबा'नंतर 'गडगे बाबा' -** नाशिकमधील 'खरात बाबा' चे अनेक कारनामे रोजच्या रोज उघड होत आहे. खरात सध्या जेलमध्ये असून त्याचे सहकारी मात्र बाहेर आहे. त्याच्या ट्रस्टवर विश्वस्त असणारे जितेंद्र शेळके व त्यांच्या पत्नीचा शुक्रवारी अपघातात मृत्यू झाला. मात्र हा अपघाती मृत्यू आहे की घातपात यावर आता चर्चा होत आहे. खरात याच्या जीवालाही धोका असल्याचे बोलले जात आहे.त्यामुळे हे प्रकरण चांगलेच गाजत असतांना आता संगमनेरातील 'गडगे बाबा' प्रकरण उघड झाल्याने राज्यात भोंदू बाबांविरोधात संताप व्यक्त होत आहे. धर्माच्या, अंधश्रद्धेच्या नावाखाली नागरिकांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात कडक कारवाईची मागणी जोर धरत आहे. पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांनी सांगितले की, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल. दरम्यान, पोलिसांकडून उर्वरित आरोपींचा शोध सुरू असून या प्रकरणातील आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### भोंदू गडगेवरील गुन्ह्यात पोलिसांनी लावली दहा कलमे

**३१८, ३१९, ३५६, ३५२, ३५३, ३३६ (४), महाराष्ट्र नरबळी आणि इतर कलम (३) अधिनियम (२१३), औषधीद्रव्ये तिलस्मी उपचार (७) अधिनियम (१५४), वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ (३३), वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ (३६)**

### बाबाला स्टींग ऑपरेशन नडले...

समाजातील अंधश्रद्धा, जादूटोणा, कर्मकांड याविरूद्ध जानजागृतीसाठी डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी आपले आयुष्य पणाला लावले. त्यांच्याच अंधश्रद्धा निर्मुलन समितीने आतापर्यंत अनेक भोंदूबाबांचे बुरखे फाडून समजासमोर आणले. त्यातून अनेकांचे जीव आणि संसार वाचवले. संगमनेरमध्येही अशाप्रकारे जनतेची लुट करणाऱ्या भोंदू गडगेबाबाचे पितळ उघडे करण्याचे काम अंनिसने सुरू केले. मात्र चोरावर मोर म्हणून किंवा चोराच्या उलट्या बोंबा म्हणून गडगेबाबाने त्याच्या माणसांना हाताशी धरून अनिसविरूद्ध खंडणी मागण्याचा बनावट व्हिडीओ प्रसारीत केला. त्यामुळे आणखी संतापलेल्या अंनिसने पुराव्यांसह याबाबीविरूद्ध कायदेशीर फिर्याद दाखल केली. आणि हा बाबा आपल्या साथीदारांसह गजाआड झाला.

### बाबाला महिलांचाही नाद...

नाशिकच्या खरात बाबांचा महिला प्रताप जगजाहीर झाल्यानंतर सर्वत्र मोठी खळबळ उडाली. त्यानंतर राज्यातील अनेक भोंदू बाबा एकापाठोपाठ जेलमध्ये गेले. त्यात संगमनेरच्या गडगेचाही नंबर लागणार होता. मात्र पुरेसे पुरावे समोर येत नव्हते. बोगस उपचार, आर्थिक फसवणूक समोर आल्यानंतर एका महिलेने या भोंदूबाबावर थेट विनयभंगाचा आरोप केला. बाबाने उपचारासाठी आपल्याला एका लॉजमध्ये बोलवले. आणि उपचाराच्या नावाखाली नको ते उद्योग करू लागला. मात्र ही महिला आधीच सावध असल्याने अनर्थ टळला. मात्र अशा प्रकारे अनेक महिलांवर त्याने अत्याचार केल्याचा संशय देखील या निमित्ताने व्यक्त होत आहे.




















# भोंदू खरात प्रकरणातील साक्षीदार जितेंद्र शेळके यांचा अपघाती मृत्यू; पत्नी ठार, मुलगा गंभीर जखमी

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - भोंदू अशोक खरातच्या 'शिवनिका ट्रस्ट'चे उपाध्यक्ष डॉक्टर जितेंद्र शेळके व त्यांची पत्नी यांचा शुक्रवारी (दि. १७) अपघाती मृत्यू झाला, तर त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे. त्यांच्या कारने समृद्धी महामार्गावर उभ्या असलेल्या एका कंटेनरला मागच्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यात जितेंद्र शेळके यांच्यासह त्यांच्या पत्नीचा जागीच मृत्यू झाला. शेळके यांची भोंदू अशोक खरात प्रकरणात चौकशी सुरू होती. 'एसआयटी'ने त्यांचा जबाबही नोंदवला होता. ते या प्रकरणातील एक महत्त्वाचे साक्षीदार होते. त्यामुळे त्यांचा मृत्यू हा अपघात की घातपात? याविषयी तर्कवितर्क लढवले जात आहेत.



यासंबंधी हाती आलेल्या माहितीनुसार, जितेंद्र शेळके हे दुपारी १ च्या सुमारास आपल्या कुटुंबासह छत्रपती संभाजीनगरहून शिर्डीच्या दिशेने जात होते. रस्त्यात समृद्धी महामार्गावरील धोत्रे गावालगत त्यांच्या कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या एका कंटेनरला मागच्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यात जितेंद्र शेळके व त्यांची पत्नी अनुराधा हे दोघे जागीच ठार झाले. तर त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला. ही धडक एवढी भीषण होती की, त्यांची कार थेट कंटेनरखाली घुसली. त्यामुळे तिचा अक्षरशः चुराडा झाला. अपघातातील जखमी मुलाला लगतच्या रुग्णालयात उपचारांसाठी हलवण्यात आले आहे.

जितेंद्र शेळके यांची कार कंटेनरला धडकल्यानंतर बराच वेळ त्याच स्थितीत कंटेनरखालीच उभी होती. नंतर कुणीतरी ही माहिती पोलीस प्रशासनाला कळवली. त्यानंतर पोलीस व ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन शेळके, त्यांची पत्नी अनुराधा व मुलाला कारमधून बाहेर काढले. पण तोपर्यंत जितेंद्र शेळके व त्यांच्या पत्नीचा मृत्यू झाला होता. हे तिघेही कारमध्ये बराच वेळ अडकले होते.

मृत जितेंद्र शेळके हे भोंदू अशोक खरातचे अत्यंत जवळचे सहकारी होते. ते खरातच्या शिवनिका ट्रस्टवर उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) त्यांचा जबाबही नोंदवला होता. त्यांची जवळपास ४ वेळा चौकशी झाली होती. त्यामुळे ते या प्रकरणातील एक महत्त्वाचे साक्षीदार होते. त्यांच्या मालकीच्या लॉन्समध्येही खरात याची भागीदारी होती. त्यामुळे खरातला अटक झाल्यामुळे शेळके प्रचंड तणावात होते. त्यातच त्यांचा अपघाती मृत्यू झाल्यामुळे ही घटना केवळ अपघात आहे की, घातपात आहे? याविषयी वेगवेगळ्या शंकाकुशंका व्यक्त केल्या जात आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी या अपघातावर संशय व्यक्त केला आहे. भोंदू अशोक खरात प्रकरणातील एक महत्त्वाची कडी असेलेले शिवनिका ट्रस्टचे संचालक जितेंद्र शेळके यांचा अपघाती मृत्यू झाल्याची बातमी ही अत्यंत धक्कादायक आहे. मला ही गोष्ट खरे तर अविश्वसनीय वाटते. कारण, गेल्या काही दिवसांत अनेक नेत्यांनी ही भीती किंवा शक्यता व्यक्त केली होती की, अशोक खरातचे एन्काउंटर होऊ शकते. त्याच्या जिवाला धोका उद्भवू शकतो. आजच्या घटनेमुळे ही शक्यता अधिक जास्त ठळक पद्धतीने अधोरेखित होत आहे.

# अक्षय तृतीये निमित्त डॉ. प्रणव माळी यांचे हृदय आरोग्यावर विशेष मार्गदर्शन

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर येथील भगवान परशुराम जयंती उत्सव समितीच्या वतीने अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर भगवान श्री परशुरामांचा जयंती उत्सव साजरा केला जाणार आहे. आगळावेगळा पद्धतीने उत्सव साजरा करत असताना, संगमनेरकर नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेऊन, या उत्सवानिमित्ताने सध्याच्या अस्थिर जगात वैद्यकीय समस्यांनी तणाव निर्माण होऊन हृदयरोगासारख्या आजारांचे प्रमाण वाढले आहे. कोविड नंतर हृदयरोगामध्ये अनेक बदल पहावयास मिळत आहे.



याच पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरिकांना बदलत्या हृदय रोगाची लक्षणे व उपचारांना अवगत करण्यासाठी, हृदयविकाराचा प्रचंड आवाका असलेले व बदलत्या हृदयरोगाचा बारकाईने अभ्यास असलेले, नाशिक, शिर्डी या ठिकाणी नामांकित हॉस्पिटलमध्ये विविध जटील हृदय विषयक शस्त्रक्रिया करणारे संगमनेरचे सुपुत्र डॉक्टर प्रणव आशुतोष माळी यांचे हृदयरोग विषयी मार्गदर्शन करणारे व्याख्यान आयोजित केले आहे. या व्याख्यानामध्ये डॉक्टर माळी निरोगी जीवनाची गुरुकिल्ली, त्याचप्रमाणे हृदयरोगाविषयी दक्षता, उपचार व लक्षणे याविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

सदर व्याख्यान सर्वांसाठी खुले आहे. व्याख्यानाचे ठिकाण मदन कुलकर्णी हॉल, घास बाजार, दिनांक १८ एप्रिल २०२६, सायंकाळी साडेसहा वाजता असून, तरी संगमनेरातील सर्वांनीच या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, ही विनंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास संगमनेरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ब्राह्मण प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. सुधाकर शिरसागर सर, कार्याध्यक्ष श्री. वैभव कुलकर्णी, युवा अध्यक्ष उत्कर्ष जोशी, महिला अध्यक्ष सौ. आरती धायगुडे, त्याचप्रमाणे या कार्यक्रमाचे संयोजक ब्राह्मण प्रतिष्ठान महिला शाखा तसेच उत्सवाचे प्रकल्प प्रमुख श्री. धनु भाऊ धायगुडे, उदय देशपांडे सर, अनिरुद्ध उपासनी, कौस्तुभ कुलकर्णी, श्री. राहुल जोशी आदी मान्यवरांनी केले आहे.

# राजूर येथे चोरट्यांची टोळी जेरबंद



राजूर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

अकोले तालुक्यातील राजूर येथील एका बंद घराचा कडी-कोयंडा तोडून घरातील सुमारे ३ लाख ८६ हजार ५०० रुपयां या दागिन्यासह रोख रक्कम चोरुन धूम ठोकणाऱ्या चार चोरट्यांना गजाआड करण्यात अपर पोलीस अधीक्षकांच्या पथकाला यश आले आहे. ३ ऑक्टोबर, २०२५ रोजी राजूर येथील कुटुंब नियमित तपासणीकरीता घराला कुलूप लावून मुंबई येथे जावून परत आले असता दरम्यानच्या काळात अज्ञात आरोपींनी बंद घराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश करुन ३ लाख ८६ हजार ५०० रुपयांचे सोन्या चांदीचे दागिने व दोन हजार रोख रक्कम असा मुद्देमाल चोरुन नेल्याबाबत राजूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या गुन्ह्यातील आरोर्षीचा शोध घेणेकामी भागाचे अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाघचौरे यांच्या आदेशानुसार पथकाने शोध घेतला असता हा गुन्हा किसन उर्फ किशोर शिवाजी बर्डे (वय २०, रा. टाहाकरी ना. अकोले) याने त्याच्या साथीदारांसह कैल्याचे निष्पन्न झाले.

सदर आरोपीचा शोध घेत असताना आरोपी हे श्रीरामपूर येथे आले असल्याची गोपनीय माहिती मिळताच कर्मवीर चौक परिसर येथे किसन उर्फ किशोर शिवाजी बर्डे, अमोल गोरख मेंगाळ (वय २०, रा. केळी ता. अकोले), श्याम शंकर मधे (वय २४, रा. पाडाळणे, ता. अकोले) असे मिळून आले. त्यांना विश्वासात घेवून विचारपूस केली असता हा गुन्हा त्यांचे इतर साथीदार लक्ष्मण बाळू रोकडे, विजय कैलास जाधव (दोघेही रा. टाहाकरी, ता. अकोले, दोघेही फरार) यांच्यासह केला असल्याची कबुली दिली. सदर आरोपीनी अशाचप्रकारचे गुन्हे राजूर पोलीस ठाणे हद्दीत केल्याचे कबुल केले असून पुढील तपास राजूरचे सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार हे करत आहे.

# शिक्षण विभागाचा बोगस कारभार खपवून घेणार नाही - आ. तांबे

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

राज्यातील शालेय शिक्षण विभागामध्ये सुरू असलेल्या अंधाधुंदी, गोंधळ आणि प्रशासकीय कामकाजाविरोधात आमदार सत्यजीत तांबे यांनी राज्याचे शिक्षण आयुक्त यांना पत्र दिले. उत्तर महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेची परिस्थिती अत्यंत गंभीर झाल्याचं नमूद करत, तात्काळ ठोस उपाययोजना न झाल्यास २५ मे २०२६ पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा देखील दिला. पत्रात नमूद केलेल्या माहितीनुसार, नाशिक पदवीधर मतदार संघातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक व अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये शिक्षण क्षेत्रातील परिस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. शिक्षक, विद्यार्थी, पालक, संस्थाचालक आणि प्रशासन यांच्यात परस्पर अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून, संपूर्ण यंत्रणा दिशाहीन झाल्याचे चित्र आहे. एसीआयटी चौकशीच्या नावाखाली लहानसहान कामेही प्रलंबित ठेवली जात असून, प्रशासनाकडून केवळ तात्पुरत्या उपाययोजना केल्या जात असल्याची टीकाही त्यांनी केली आहे.



याशिवाय शिक्षण विभागातील अनेक प्रश्न हे आर्थिक नसून दैनंदिन प्रशासकीय कामकाजाशी संबंधित असतानाही, वारंवार अर्थसंकल्पाचे कारण पुढे केले जात असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त करत, शिक्षकांवर जनगणना, मतदार नोंदणी, बीएलओसारख्या विविध शासकीय कामांचा अतिरिक्त भार टाकला जात असल्यामुळे त्यांच्या अध्यापनाच्या मुख्य कार्यावर परिणाम होत असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणापेक्षा अहवाल, लेखापरीक्षण आणि पूरक कामांवर अधिक भर दिला जात असल्याची बाबही चिंताजनक असल्याचे स्पष्ट केले.

आमदार तांबे यांच्या मागण्यांमध्ये उत्तर महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेचा सखोल आढावा - या दरम्यान आमदार तांबे यांनी मुख्य शिक्षण आयुक्तांकडे तात्काळ अंतर्गत बैठक घेऊन सर्व प्रश्नांचा सखोल आढावा घेण्याची मागणी केली आहे. तसेच उत्तर महाराष्ट्रातील सर्व जिल्हा शिक्षण अधिकारी, उपसंचालक, शिक्षक संघटना, संस्थाचालक, विद्यार्थी व पालक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत पुणे येथे मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संयुक्त बैठक आयोजित करून, प्रलंबित प्रश्नांवर ठोस व दीर्घकालीन निर्णय घ्यावेत, अशी मागणी देखील केली आहे.

२५ मे पासून शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन - या सर्व शैक्षणिक विषयांवर ठोस निर्णय न झाल्यास, २५ मे २०२६ पासून मुख्य शिक्षण आयुक्तांच्या कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येईल आणि प्रश्न निकाली निघेपर्यंत ते सुरूच राहील, असा इशारा देखील आमदार तांबे यांनी दिला आहे.

आंदोलन हे माझ्यासाठी नवीन नाही - आ. तांबे. सत्यजीत तांबेसाठी आंदोलन हे नवीन नाही, वयाच्या १८ वर्षापासून विविध चळवळींत सक्रिय सहभाग ठेवत, त्यांनी वारंवार शिक्षणाच्या विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात आवाज उठवला आहे. जुनी पेन्शन योजना असो, विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळून देणे असो, यांसह विविध प्रश्नांचा शासनाकडे पाठपुरावा केला आहे. अधिवेशनात देखील शैक्षणिक प्रश्नांवर आमदार तांबे यांनी आक्रमक भूमिका घेऊन वेळोवेळी प्रश्न सोडवले आहेत.

# लक्ष्मणबाबा यात्रा उत्सव रविवारपासून

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेरचे श्रद्धास्थान असलेल्या श्री लक्ष्मण बाबांचा यात्रोत्सव रविवारी, अक्षय्य तृतीयेला, मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. ब्रिटीश राजवटीच्या सुरुवातीच्या काळापासून चालत आलेल्या या परंपरेला यंदा पुन्हा एकदा लोकनाट्य तमाशा आणि कुस्त्यांच्या हगाम्याने नवा साज चढणार असून, मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या उत्सवासाठी संगमनेर नगरपालिकेच्या प्रांगणासह संपूर्ण परिसर सज्ज झाला आहे.



यात्रेच्या मुख्य दिवशी, म्हणजेच रविवारी अक्षय्य तृतीयेला, पहाटेपासूनच मंदिरात धार्मिक विधींना सुरुवात होणार आहे. अभिषेक आणि होमहवन झाल्यानंतर, सायंकाळी बाबांच्या प्रतिमेची शहरातून सवाद्य मिरवणूक काढली जाणार आहे. या मिरवणुकीत स्थानिक कलापथके आणि फटाक्यांची मोठी आतिषबाजी हे मुख्य आकर्षण असेल. करमणुकीचा वारसा जपत, यंदा यात्रा कमिटीने नारायणगावच्या लोकप्रसिद्ध अश्विनी-शिवानी बोरगावकर यांच्या लोकनाट्य तमाशाचे आयोजन केले आहे. लावणी आणि लोककलेचा हा आविष्कार रविवारी रंगणार आहे.

यात्रेच्या दुसऱ्या दिवशी, सोमवारी (ता. २०), दुपारी नगरपालिका प्रांगणात कुस्त्यांचा जंगी हगामा पार पडणार आहे. नामवंत मल्ल पालिकेच्या प्रांगणात आपली कुवत आजमावणार असून, विजेत्यांना एक रुपयापासून पाच हजार रुपयांपर्यंतची रोख बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे. या दोन दिवसांच्या भक्ती आणि शक्तीच्या सोहळ्याची सांगता सोमवारी सायंकाळी महाप्रसादाने होणार आहे. यासर्व कार्यक्रमांना आणि बाबांच्या दर्शनाला संगमनेरकरांनी अवश्य यावे, असे आवाहन यात्रा कमिटीने केले आहे.

# घर खरेदीची सुवर्ण संधी

## आजचा निर्णय, उद्याचा मोठा फायदा

सध्या बांधकाम क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर दरवाढ सुरू आहे. स्टील, सिमेंट, टाईल्स, इलेक्ट्रिकल व प्लंबिंग साहित्य तसेच मजुरी दरात २० टक्के ते ४५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. यामुळे एकूण प्रोजेक्ट कॉस्टमध्ये लक्षणीय वाढ होत आहे. यासोबतच जागतिक स्तरावरील तणावपूर्ण परिस्थिती, म्हणजेच युद्धजन्य वातावरण, यामुळे कच्चा माल पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. क्रूड ऑईल, मेटल्स आणि ट्रान्सपोर्ट खर्च वाढल्यामुळे बांधकाम खर्च आणखी वाढत आहे. या सर्व घटकांचा थेट परिणाम म्हणजे भविष्यातील नवीन प्रोजेक्ट्सचे दर अधिक असणे निश्चित आहे. पुढील काही महिन्यांत फ्लॅट्सच्या किंमतीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.



यामुळे सध्याचा काळ घर खरेदीसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. सध्या उपलब्ध दर तुलनेने कमी आहेत. दरवाढीपूर्वी बुकिंगची ही अंतिम संधी मानली जात आहे. कन्स्ट्रक्शन प्रगतीनुसार मूल्यवृद्धीचा फायदा मिळू शकतो. दीर्घकालीन सुरक्षित गुंतवणूक म्हणूनही याकडे पाहिले जात आहे. भविष्यात भाडे उत्पन्नाची संधी उपलब्ध होण्याची शक्यता असल्याने, आजची गुंतवणूक ही भविष्यातील मजबूत आर्थिक निर्णय ठरू शकते.

गंगासृष्टी - संपुर्णम प्रोजेक्टची वैशिष्ट्येही ग्राहकांसाठी आकर्षण ठरत आहेत. १०० टक्के प्लॅनिंग-आधारित आधुनिक टाउनशिप, प्रशस्त अंतर्गत रस्ते व ड्रेनेज व्यवस्था, २४७ सुरक्षा व सीसीटीव्ही निगराणी, हिरवळयुक्त, शांत व प्रदूषणमुक्त परिसर, रेन वॉटर हार्वेस्टिंग सुविधा, आधुनिक क्लब हाऊस व जीवनशैली सुविधा, मुलांसाठी सुरक्षित प्ले-झोन आणि शहराच्या मध्यवर्ती भागाजवळ उत्तम लोकेशन यामुळे हा प्रकल्प गुंतवणुकीसाठी उपयुक्त ठरत आहे.

संगमनेर हे शहरही झपाट्याने विकसित होत आहे. शहरात रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण संस्था, आरोग्य सुविधा आणि व्यापारी वाढ वेगाने होत असल्यामुळे निवासी प्रॉपर्टीची मागणी सातत्याने वाढत आहे. त्यामुळे प्रॉपर्टीमध्ये केलेली गुंतवणूक भविष्यात अधिक फायदेशीर ठरण्याची शक्यता आहे. बांधकाम खर्च वाढत असताना प्रॉपर्टीचे दरही वाढणे निश्चित आहे. त्यामुळे आजचा निर्णय हा उद्याचा मोठा आर्थिक फायदा ठरू शकतो. घर खरेदीची ही संधी भविष्यात मोठ्या लाभाची ठरू शकते.

**संपर्कासाठी –**
**प्रशांत गुंजाळ, संचालक, गंगासृष्टी, संगमनेर, मो. ७२६२ ०१० ०१०**

# आश्वी येथे बिबट्याच्या हल्ल्यात महिला जखमी

आश्वी

(युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक परिसरात बिबट्याने शुक्रवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास, आपल्या घरामागील शेतात कामासाठी गेलेल्या एका ५९ वर्षीय महिलेवर प्राणघातक हल्ला केला. या भीषण हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली असून, सध्या त्यांच्यावर प्रवरा - ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, सुमन बाळासाहेब खेमनर (वय - ५९) या शुक्रवारी सकाळी नेहमीप्रमाणे जनावरांसाठी घास कापण्यासाठी घरामागील शेतात (गट नंबर २३१) चालल्या होत्या. यावेळी शेताशेजारील दाट गवतामध्ये दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर झडप घातली. अचानक झालेल्या या हल्ल्याने त्या घाबरल्या, मात्र त्यांनी डगमगून न जाता आरडाओरडा करत बिबट्याचा प्रतिकार केला. महिलेच्या आक्रमक पवित्र्यामुळे बिबट्याने तेथून पळ काढला, मात्र तोपर्यंत त्यांच्या हाताच्या दंडाला खोलवर जखमा झाल्या होत्या.

सुमन यांचा आरडाओरडा ऐकून त्यांचा मुलगा सुभाष खेमनर, किशोर पिलगर, शरद खेमनर, विशाल जऱ्हाड आदींसह स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली. जखमी अवस्थेतील सुमन यांना तात्काळ निमगाव जाळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र, जखमा खोलवर असल्याने आणि मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाल्यामुळे त्यांना पुढील उपचारांसाठी लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

# संपादकीय...

## अक्षय तृतीया शुभ कार्यांची सुरुवात



अक्षय तृतीया हा हिंदू धर्मातील एक अत्यंत शुभ आणि पवित्र सण आहे. वैशाख शुद्ध तृतीयेला अक्षतृतीया संबोधतात. अशी मान्यता आहे की, या दिवशी छत्री, पंखा, फळे, पाणी याचे दान करावे. वृक्षारोपण करावे. या गोष्टी अत्यंत पवित्र मानल्या जातात. आपण दान केले ते सर्वांना सांगत सुटू नये. उजव्या हाताने केलेले लहान डाव्या हातालाही कळू नये. आपण जे दान करणार ते अक्षय, म्हणजे कधीच न संपणारे राहते. आज भगवान विष्णू यांची ही पूजा करतात. लक्ष्मीची पूजा करतात. त्या दिवशी केलेले प्रत्येक शुभ कार्य अक्षय, म्हणजे अविनाशी मानले जाते. भगवान शंकरांचे एक नाव अक्षय आहे. त्याचा अर्थही शाश्वत आणि अविनाशी असा आहे. हा दिवस पृथ्वीचे रक्षक भगवान विष्णू यांना समर्पित आहे. हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार भगवान विष्णूंनी श्री परशुरामाच्या रूपात पृथ्वीवर अवतार घेतला. म्हणून हा दिवस भगवान परशुरामांचा जन्मदिवस म्हणूनही साजरा केला जातो. भगवान परशुराम हे धार्मिक मान्यतेनुसार त्रेता आणि द्वापार युगापर्यंत चिरंजीव राहिले. धार्मिक मतानुसार त्रेतायुगाच्या प्रारंभी पृथ्वीची सर्वात पवित्र नदी गंगा, या दिवशी स्वर्गातून पृथ्वीवर आली होती. भगीरथाने गंगा नदी पृथ्वीवर आणली होती. हा दिवस माता अन्नपूर्णा यांनाही समर्पित आहे. दक्षिणेकडे या दिवशी कुबेराची पूजा करतात. कुबेराने शिवाला प्रसन्न केलेले होते आणि त्याने वरदान मागून घेतले, लक्ष्मी कडून आपली संपत्ती परत मिळवण्यासाठी वरदान मागितले. म्हणून आज माता लक्ष्मीची ही पूजा करतात. महर्षी वेदव्यास यांनी अक्षतृतीयेला महाभारत लिहिण्यासाठी सुरुवात केली. या दिवशी त्यांना अक्षय पात्र प्राप्त झाले. हा दिवस सौभाग्य आणि समृद्धीचा आहे. या दिवशी पितरांना तर्पण करतात, पिंडदान करतात. जलयुक्त घट दान करतात. साडेतीन मुहूर्तांपैकी, हा एक मुहूर्त आहे. आज तन, मन आणि धनाने अत्यंत गरजूंना दान करावे. अस्यां तिथी क्षयमुपैति हुतं न दत्तं, ते ना क्षयेती करिता मुनिभिस्तृतीया! उद्दिश्य देवतापितृक्रिययतेमनुष्यै:, तययाक्षयं भवति भारत सर्व मेव!! भगवान श्रीकृष्ण म्हणतात, हे युधिष्ठरा! या तिथिला केलेले दान व हवन कधीही क्षयाला जात नाही. म्हणून मुनी या दिवसाला अक्षय्य तृतीया म्हणतात. या दिवशी अनेक ठिकाणी पाणपोई सुरू करतात. दान करताना मात्र आपण श्रेष्ठ आहोत आणि घेणारा दरिद्री आहे, अशी भावना जर मनात आणली, तर त्या दानाचा काही उपयोग नाही. अक्षय तृतीया हा सौभाग्य आणि समृद्धीचा दिवस आहे. आज आपण शुभदर्शन, शुभ कथन, शुभ चिंतन करावे. श्राद्धा सारखा विधी करून काहीजण पितरांच्या नावाने जलकुंभ दान करतात. अक्षय तृतीयेला आपण शुभ संकल्प करावा. मी वाईट बोलणार नाही. मी वाईट बघणार नाही. मी वाईट ऐकणार नाही. हा संकल्प अक्षय्य राहील. अशा प्रकारे आपण अक्षय तृतीयेला लक्ष्मी आणि विष्णूची पूजा करावी. पितृ तर्पण करावे. नवीन संकल्प, नवीन कार्य सुरू करावे. आपल्याकडून जे शक्य होईल तेवढे अन्न, वस्त्र, पाणी दान करावे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सकारात्मक विचार करून, उपकाराच्या भावनेने न करता, अतिशय शुद्ध मनाने या सर्व गोष्टी कराव्यात. गुप्त दान करावे.

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर, मो. ९८९०१६३६४२**

## अल्पवयीन मुलाला कोयत्याने मारहाण

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अयोजित करण्यात आलेल रक्तदान शिबीर सुरु असताना त्याठिकाणी येवून मागील भांडण उकरुन काढत चार तरुणांनी कोयता, लोखंडी रॉडच्या साहाय्याने दोघांना बेदम मारहाण केली. यात अल्पवयीन मुलासह दोघे गंभीर जखमी झाले आहे. या प्रकार शहरातील इंदिरानगर, गल्ली नं. ४ येथे बुधवार १५ एप्रिल रोजी घडला. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात चार आरोपींवर विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिद्धार्थ अजय दारोळे याने याबाबत फिर्याद दिली. त्यात म्हटले आहे की, डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर सुरु असताना दुपारी तेथे अशोक पगारे, निखिल खरात, विशाल खरात, आनंद गांधी आले. त्यांनी तुम्ही शिबीर का घेतले, असे म्हणत सागर पगारे याने सिद्धार्थ याच्या डाव्या डोळ्यावर वार केला तर निखिल याने लोखंडी रॉडने हातावर, पायावर मारहाण केली. सर्वेश शिंदे हा मध्ये पडला असता त्यालाही या चौघांनी लोखंड रॉडने मारहाण केली. तसेच सिद्धार्थ याच्या खिशातून ५२००/- रु. तसेच गळ्यातील ६ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन काढून पळून गेले. यापरणी वरील चार आरोपींवर बी.एन.एस. ११९ (१), ३(५), ३७(१) (a), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अक्षयतृतीया मुहूर्त प्रसंगी बालविवाह रोखण्यासाठी प्रशासन सज्ज - जिल्हाधिकारी

अहिल्यानगर

(जिल्हा माहिती कार्यालय)-



अक्षयतृतीयेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने विशेष सतर्कता बाळगण्यास सुरुवात केली असून, कुठेही बालविवाह होऊ नयेत, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्क राहून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

अक्षयतृतीया हा सण विवाहासाठी शुभ मानला जात असल्याने, या दिवशी सामूहिक तसेच एकल विवाह सोहळ्यांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन केले जाते. या पार्श्वभूमीवर बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेता, प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ नुसार मुलांचे किमान वय २१ वर्षे, तर मुलींचे किमान वय १८ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. या वयोमर्यादेपेक्षा कमी वयात विवाह केल्यास, तो बालविवाह ठरून बेकायदेशीर मानला जातो. अशा प्रकरणांमध्ये संबंधित पालक, नातेवाईक, आयोजक तसेच विवाह सोहळ्यात सहभागी असलेल्या सर्व संबंधितांवर गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या गुन्ह्यासाठी दंड व कारावासाची तरतूद आहे.

शासनाच्या अधिसूचनेनुसार ग्रामीण भागात ग्रामसेवकांची बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, अंगणवाडी सेविका सहाय्यक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शहरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना प्रतिबंध अधिकारी, तर मुख्यसेविकांना सहाय्यक अधिकारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

बालविवाह रोखण्यासाठी मंदिरे, मशिदी, चर्च, गुरुद्वारे, मंगल कार्यालये, बँडपथके, डीजे, केटरर्स, फोटोग्राफर तसेच विवाह विधी करणारे धर्मगुरूंनी बालविवाहास कोणत्याही प्रकारे सहकार्य करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित यंत्रणांनी अशा ठिकाणी विशेष लक्ष ठेवून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

अक्षयतृतीया तसेच वर्षभर कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास, तात्काळ चाइल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा पोलीस हेल्पलाईन ११२ या टोल-फ्री क्रमांकावर कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहकार्य करावे, असेही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी नमूद केले.

# जिजामाता स्कूलमध्ये बालसंस्कार शिबिरास प्रारंभ

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-





कै. शंकरराव शेवाळे पाटील ट्रस्ट संचलित जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी उन्हाळी बालसंस्कार शिबिरास उत्साहात सुरुवात झाली. शिबिरासाठी ८० पेक्षा अधिक चिमुकल्यांनी सहभाग घेतला. शिबिराची सुरुवात सकाळी आकर्षक रांगोळीने व निसर्गरम्य वातावरणात, विविध खेळांचे आयोजन करून करण्यात आली.

मिकी माऊस व तात्या विंचू याचे रूप धारण करून आलेल्या कलाकारांनी मुलांचे लक्ष वेधून घेत, मनसोक्त मनोरंजन केले. विद्यार्थ्यांमध्ये त्यानंतर, जिजाऊ वंदना, संस्कृत श्लोक, बडबड गीते व योगसाधना, नृत्य या उपक्रमांनी वातावरण प्रफुल्लित झाले.

यानंतर विद्यार्थ्यांना सकस व पौष्टिक आहार देण्यात आला. याचबरोबर विविध खेळ, रंगभरण यांसारखे सर्जनशील उपक्रम घेण्यात आले. शिबिराच्या पहिल्याच दिवशी चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद सर्वांनाच भावला.

या उन्हाळी बालसंस्कार शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा व्यवस्थापन, प्रशासन, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# कोल्हेवाडी येथे वारकरी बाल संस्कार शिबिराचे आयोजन

संगमनेर ()-



तालुक्यातील कोल्हेवाडी येथील ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख गुरुकुल वारकरी शिक्षण संस्थेच्यावतीने ०२ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत भव्य वारकरी बाल संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली.

बालमनावर धर्मसंस्कार, अधात्म आणि भावी पिढी सुसंस्कारित व्हावी या हेतुने या बाल संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये श्रीमद् भगवद्गीता, हनुमान चालीसा, मृदंग, हार्मोनियम, टाळ, वारकरी गायन, पावल्या, चाली, हरिपाठ, हिंदु संस्कृतीचे बालसंस्कार, योगासने, आरोग्य मार्गदर्शन आदि विषय शिकवले जाणर आहे. या शिबिरार्थींना मार्गदर्शन करण्यासाठी ह.भ.प. वायदंडे नाना, ह.भ.प. मनोज महाराज, ह.भ.प. चंद्रकांत महाराज, ह.भ.प. शिवाजी महाराज, ह.भ.प. स्वप्निल महाराज, ह.भ.प. महेश महाराज, ह.भ.प.किरण महाराज , ह.भ.प.भगवान महाराज , ह.भ.प. सागर महाराज , ह.भ.प. साहिल, ह.भ.प. आदि महाराज उपस्थित राहणार आहे.

या शिबिराच्या सांगता प्रसंगी तीन दिवसीय किर्तन महोत्सवाचे देखील आयोजन करण्यात आले आहे. यात १३ मे रोजी ह.भ.प. साहिल महाराज गुंजाळ यांचे प्रवचन, ओमकार महाराज दुडे यांच किर्तन, १४ मे रोजी ह.भ.प. संदिप महाराज गुंजाळ, ह.भ.प. कृष्णा महाराज देशमुख यांचे प्रवचन तर गोविंद महारा गवळी यांचे किर्तन होणार आहे. १५ मे रोजी भागवताचार्य विजयजी महाराज गवळी, वाशिम यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.

उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये आपल्या मुलांना मोबाईल व टिव्ही पासून दुर ठेवून आपल्या मुलांच्या (१० वर्षापुढील) बालमनावर सुसंस्कार घडावे यासाठी पालकांनी आजच अधिक माहितीसाठी ८८८८२१५३८१, ९५५२९१०१८९ या क्रमांकाशी संपर्क साधावा.

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
NADEEM MALANG SHAIKH
TO NEW NAME AS
NADIM MALANG SHAIKH
ADD – KOLHEWADI ROAD, AT POST - SAMNAPUR, TAL - SANGAMNER, DIST - AHILYANAGAR

पाहिजेत
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता – तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947





卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
MALPANI
मालपाणी उद्योग समूह आयोजित
भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था
सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

We Are Hiring SANGAMNER
Marketing Team
SLH Tax Advisors Pvt Ltd
Marketing Manager - 1 (25k to 50k+ Incentive)
Marketing Executive - 5 (20k to 35k + Incentive)
Digital Marketing - 1 (15k to 25k + Incentive)
Telecaller (Female) - 1 (15k to 20k + Incentive)
Salary + Incentives
Fast Growth Opportunity
Address - SLH Advisors Pvt Led, Saish Business Park,Behind Joshi Palace, Sangamner
Call/WhatsApp- 7264804000



We Are Hiring... FEMALE STAFF ONLY
Accountant (Tally, Financial Reporting)
Telecaller (Communication, Sales)
WALK-IN INTERVIEW
Dates: 21st - 22nd April 2026
Time- 9 AM To 4 PM
Interview Venue - LTC Office, Krushi Utpanna Bazar Samiti, Sangamner, Shop No. 15/16
Company Address: LTC Industries Survey No. 47, Plot No. 141-144, Sangamner MIDC, Sangamner, Dist. Ahilyanagar - 422605.
CONTACT- 9975367595/9143304304

पाहिजेत
अनुभवी स्त्री/ पुरुष
सेल्समन व हेल्पर
संपर्क
कटारिया क्लॉथ सेंटर
पत्ता – मेन रोड, संगमनेर ४२२६०५
9595225428

पाहिजेत
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

गाळा विकणे आहे
२४५ स्क्वे.फुट आर.सी.सी. बांधकाम असलेला चैतन्यनगर येथील गाळा विकणे आहे
9405261738
9822315031

पाहिजेत
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

रॅक विकणे आहे
सुपर शॉपी, किराणा दुकान, मेडिकल किंवा इतर दुकानांसाठी लागणाऱ्या रॅक आणि काउंटर विकणे आहे
(सर्व मटेरियल नवीन आहे फक्त दोन महिने वापर झाला)
9881855547

भाड्याने देणे आहे
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

खुशखबर...
आपल्या मुला मुलींचे लग्न आमच्या प्रशस्त मंगल कार्यालयात करा
साई मंगल लॉन्स
थोड्याच तारखा शिल्लक
पत्ता– समनापुर, एच पी पेट्रोल पंप शेजारी
संपर्क– प्रताप गोडगे
9890924380

READ E- NEWS ON
Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta

पाहिजेत
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ऑसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

पॅनल देणे आहे

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पॅनल देणे आहे



भंडारी
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# युवा संगमातून इतिहासाची शिकवण, भविष्याची दिशा : मंत्री पाटील

## माजी मंत्री थोरातांच्या नेतृत्वाखाली सर्वांगीण विकास; युवकांना एकजुटीचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सहकारातून तालुक्याच्या विकासाचा पाया घातला. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी शेती, शिक्षण, सहकार, दुग्धविकास, आर्थिक समृद्धीतून हा तालुका विकासातून पुढे नेला. युवकांनी इतिहास कधीही विसरू नाही असे सांगताना युवक काँग्रेसचा हा कार्यक्रम इतिहासाचे मार्गदर्शन घेऊन भविष्याची दिशा ठरवणारा असल्याचे गौरवोद्गार विधिमंडळ पक्षाचे गटनेते माजी मंत्री आमदार सतेज पाटील यांनी काढले आहे.



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सह.साखर कारखाना कार्यस्थळावर संगमनेर तालुका युवक काँग्रेस व एनएसयूआयच्या वतीने आयोजित युवा संगम कार्यकर्ता प्रशिक्षण आणि संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे होते. तर व्यासपीठावर सौ. दुर्गाताई तांबे, माजी आमदार उल्हास दादा पवार, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, हनुमंत पवार, सागर साळुंखे, सय्यद आफरीन मुजफ्फर हुसेन, ऋषिकेश पाटील, बालाजी गाडे, संग्राम खोपडे, डॉ.जयश्रीताई थोरात, गिरीजा पिचड, राहुल उगले, अजय फटांगरे, सोमेश्वर दिवटे, निखिल पापडेजा, शेखर सोसे, सुभाष सांगळे आदींसह युवक काँग्रेसचे विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या युवा संवाद कार्यक्रमात बोलताना माजी मंत्री आ. सतेज उर्फ बंटी पाटील म्हणाले की, संगमनेर तालुका हा लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वामुळे शेती, सहकार, शिक्षण, आर्थिक समृद्धी अशा सर्व क्षेत्रांमध्ये राज्याला दिशा देत आहे. अनेक राष्ट्रपुरुषांनी हा देश स्वातंत्र्य केल्यानंतर आज स्वकर्तृत्वातून जगापुढे उभा करण्यामध्ये मोठा वाटा उचलला आहे. त्यांचा आदर आपण केलाच पाहिजे. भाजप प्रणित आघाडी काँग्रेसचा विचार मोडीत काढण्यासाठी सर्व उपाय करत आहेत. खोटा इतिहास आणि माहिती डिजिटल प्लॅटफॉर्मवरून पसरवली जात आहे. प्रसार माध्यमांवर अनेक निर्बंध घातले आहेत. सोशल मीडिया ताब्यात घेतला आहे.

काँग्रेस पक्ष सर्व जाती धर्मांना घेऊन पुढे जात आहे. आमचा राम आम्हाला दाखवण्याची गरज नाही कारण तो हृदयात आहे. मात्र भाजप कडून देवतांचे राजकारण केले जात आहे. महाराष्ट्रात ४००० कोटींचे ड्रग्स पकडले आहे. तरुण पिढी बिघडवण्यासाठी हे षड्यंत्र उभारले जात आहे. संगमनेर तालुक्यात एका बाजूला सुसंस्कृत आणि सर्वांना घेऊन जाणारे नेतृत्व आहे. तर दुसऱ्या बाजूला दादागिरी आणि अशांतता वाढवणारे नेतृत्व आहे. तालुक्यातील सर्वांना चूक लक्षात आली असून आता सर्वांनी भूतकाळातील झालेला अपघात विसरून भविष्य घडवण्यासाठी एकजुटीने काँग्रेसच्या पाठीशी उभे रहा असे आवाहन त्यांनी केले.

तर माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, २०२४ च्या घटनेने राज्य हळहळले. आपत्ती मधून इष्टापत्ती निर्माण करायची असते. नव्याने सर्वांना बरोबर घेत पुढे जायचे आहे. तालुक्याची दिशा ठरवायचे आहे. सामान्य माणसाच्या हिताचा विचार करून जे काम करतात त्यांच्या पाठीशी गोरगरिबांची ताकद असते.आपण हिंदू आहोत. पण दुसऱ्याचे द्वेष करणारे नाही. संत आणि वारकरी संप्रदायाचा वारसा आणि राज्यघटनेचे विचार आपल्या सर्वांना पुढे न्यायचे आहे. पसायदान लिहिणारे संत ज्ञानेश्वर,तुकाराम यांना त्रास देणारी मुंबाजी प्रवृत्ती आजही आहे. निवडणूक आयोग, न्यायालय, ईडी,सीबीआय या संस्था स्वायत्त आहे की नाही हा मोठा प्रश्न असून देश चुकीच्या दिशेने चालला आहे देश वाचवण्यासाठी युवकांनी आता पुढे आले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे म्हणाले की, संगमनेरने आमच्यावर कायम प्रेम केले. निळवंडे धरणाचे पाणी थोरात साहेबांमुळे या भागाला मिळाले असून काही लोक श्रेय घेण्याचा प्रयत्न करत आहेत. जीवनात अपघात घडतात. मात्र त्यांनी खचून न जाता लढण्यासाठी तयार राहा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवक काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष कॅन्सरतज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात यांनी केले. यावेळी महाराष्ट्र काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांची प्रकट मुलाखत संपन्न झाली. युवकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी मनमोकळी उत्तरे दिली.

# घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत फेटाळले



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६, केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक, २०२६ आणि सीमांकन विधेयक, २०२६ लोकसभेत सादर केली होती. या विधेयकांच्या बाजूने पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सत्ताधारी पक्षातील विविध नेत्यांनी भूमिका मांडली. तर विरोधी पक्षांकडून अखिलेश यादव, प्रियांका गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, अरविंद सावंत, अमोल कोल्हे, वर्षा गायकवाड, कल्याण बॅनर्जी यांच्यासह विरोधी पक्षांनी बाजू मांडली. हे घटनादुरुस्ती विधेयक असल्याने मंजूर करण्यासाठी लोकसभेतील उपस्थित सदस्यांच्या दोन तृतियांश मते आवश्यक असतात. लोकसभेत या घटनादुरुस्ती विधेयकावर मतविभाजनाद्वारे मतदान घेण्यात आले. घटनादुरुस्तीच्या बाजूने पहिल्या फेरीत २९८ मतदान झाले. तर घटनादुरुस्ती विधेयकाच्या विरोधात २३० मते नोंदवली गेली आहेत. एकूण ५२८ खासदारांनी मतदानं केले. आता राज्यसभेत मतदान होणार आहे. ५२८ चं दोन तृतियांश ३५२ होतं त्यामुळं घटनादुरुस्ती विधेयक मंजुरीसाठी आवश्यक संख्याबळ सरकारकडे नसल्याचं स्पष्ट झाले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६ नामंजूर झाल्याचं जाहीर केले. यानंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी इतर दोन विधेयकं पुढे न नेण्याचा निर्णय घेतला आहे.केंद्र सरकारकडून महिला आरक्षण लोकसभेत आणि विधानसभेत संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयकात लोकसभेच्या जागा वाढवण्याचे प्रस्तावित केले आहे. २०२९ च्या निवडणुकीत लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांमध्ये वाढ करुन राज्यातील लोकसभेच्या जागा ८१५ आणि केंद्रशासित प्रदेशांच्या जागा ३५ जागा मिळून ८५० जागा करण्याचा प्रस्ताव विधेयकात होता. सरकारचा महिला आरक्षणातील दुरुस्ती विधेयकासोबत लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेचं विधेयक मांडले होते. विरोधी पक्षांकडून नेमका याच मुद्याला आक्षेप होता.

अमित शाह यांनी विरोधी पक्षांवर टीका करताना म्हटलं की २०२३ मध्ये विरोधी पक्ष महिलांना आरक्षण देण्याचा शब्द दिला होता आता द्यायचा विषय आलेला असताना मागं हटत आहेत. महिला आरक्षण लटकवत आहात, तुम्ही निवडणुकीत जिथं जिथं जात असाल तिथं तुम्हाला या देशातील महिलांचा आक्रोश सहन करावा लागेल, असे अमित शाह म्हणाले. केंद्र सरकारचा महिला आरक्षण विधेयकासोबत परिसीमन विधेयक आणल्याने विरोधी पक्षांनी सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

प्रियांका गांधी यांनी सरकारने आणलेल्या विधेयकावर बोलताना यापूर्वी महिला आरक्षण विधेयकाला सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी विरोध केल्याचं म्हटलं हाते. केंद्र सरकारला महिला आरक्षण लोकसभा आणि विधानसभेत लागू करायचे असेल तर ५४३ जागांमध्येच अंमलबजावणी करावी, अशी भूमिका प्रियांका गांधी यांनी मांडली. केंद्र सरकारचा लोकसभेची सदस्यसंख्या ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रयत्न वरवर पाहता यात आपत्ती वाटत नाही मात्र सखोलपणे विचार केल्यास यातील राजकीय हेतू लक्षात येतो, असं काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी म्हणाल्या होत्या.

## भोंदू खरातची रवानगी न्यायालयीन कोठडीत

नाशिक - राज्यभरात खळबळ उडवून देणाऱ्या भोंदू अशोक खरात प्रकरणाच्या सुनावणीत आज महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. महिला अत्याचार प्रकरणातील चौथ्या गुन्ह्याची पोलीस कोठडी संपल्याने आज खरातला नाशिक जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने त्याची रवानगी सध्या न्यायालयीन कोठडीत केली असून, उद्या त्याला पुन्हा पाचव्या गुन्ह्यात हजर केले जाणार आहे. सुरक्षेच्या कारणास्तव अशोक खरातला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून न्यायालयासमोर सादर करण्यात आले. सुरुवातीला न्यायाधीशांनी त्याचे नाव विचारून ओळख पटवून घेतली.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग - १० जागा
टेली कॉलिंग - १० जागा
सेल्स ऑफिसर - ०५ जागा
ड्रायव्हर - ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता-
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग
• मधुमेह व हृदयरोग
• दमा व श्वसनाचे विकार
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार
• जनरल सर्जरी
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया
• किडनी विकार
• मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• सर्पदंश व विषबाधा
• बालरोग चिकित्सा विभाग
• प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605
DEVISH ADVERTISER

स्वास्थ्य रक्षणाय रोग परिमोक्षाय
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

# आरोग्य सेवेची नवी ओळख – डॉ. प्रकाश वाकचौरे यांचे अकोले हॉस्पिटल

AKOLE HEALTH CARE PVT. LTD.




## अक्षय तृतीया व वर्धापन ०४ दिन

निमित्त

सर्व नागरिकांना, हितचिंतकांना आरोग्यमय

## शुभेच्छा

**डॉ. प्रकाश पंढरीनाथ वाकचौरे** (मॅनेजिंग डायरेक्टर)

**सौ. रूपाली प्रकाश वाकचौरे** (मॅनेजिंग डायरेक्टर)







### उपलब्ध सुविधा

- मुख्यमंत्री सहाय्यता निधी.
- बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांकरता बांधकाम योजनेअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया.
- आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत 2399 उपचार व शस्त्रक्रिया प्रत्येक कुटुंबास प्रतिवर्षी पाच लाखापर्यंत आरोग्य संरक्षण.
- मेडिक्लेम कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- आधुनिक C ARM मशीन
- सांधा रोपण शस्त्रक्रिया
- मुतखड्याचे ऑपरेशन जनरल सर्जरी
- हाडांच्या शस्त्रक्रिया
- मणक्याच्या शस्त्रक्रिया
- नॉर्मल व सिझरियन डिलिव्हरी
- लहान मुलांचे ऑपरेशन
- आय सी यु एन आय सी यु
- अपघात विभाग





अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर ग्रामीण रुग्णसेवेचा ११ वर्षांचा यशस्वी प्रवास तसेच अकोले हॉस्पिटलचा चौथा वर्धापन दिन संपन्न होत आहे.

ग्रामीण भागात काम करत असताना डॉ. प्रकाश वाकचौरे यांनी २०११ रोजी दापूर, तालुका सिन्नर येथे जनरल प्रॅक्टिस सुरू केली. प्रचंड लोकसंपर्क व कामाची आवड असल्यामुळे त्यांनी दापूर येथे तीन वर्षे सेवा दिली. त्यानंतर मूळगाव परखतपूर असल्यामुळे अकोले येथे हॉस्पिटल सुरू करण्याचा निर्णय घेतला. २०१४ रोजी 'डॉ. वाकचौरे जनरल हॉस्पिटल'च्या माध्यमातून अकोले येथे रुग्णसेवा सुरू करण्यात आली. यावेळी त्यांनी भांडकोळी हॉस्पिटल येथे रात्रपाळीत रेसिडेंट मेडिकल ऑफिसर म्हणून नऊ वर्षे काम केले. या काळात प्रत्येक रुग्णाला सेवा देत, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होत दिवस-रात्र काम करून लोकांचा विश्वास संपादन केला.

काम करत असताना अकोले येथे सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांची ओपीडी सुरू करण्याची कल्पना त्यांच्या मनात होती. २०२२ मध्ये अकोले हॉस्पिटलच्या माध्यमातून ही कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली आणि ती यशस्वी केली. अकोले येथे प्रथमच सुपर स्पेशालिस्ट सेवा सुरू करण्यात आली. सध्या या हॉस्पिटलमध्ये सर्जिकल ऑर्थोपेडिक सर्जन, न्यूरोसर्जन, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, गॅस्ट्रोस्कोपी, एंडोस्कोपी, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, डिलिव्हरी व सिझेरियन, पोटाच्या, हाडांच्या, मणक्याच्या व मुतखड्याच्या शस्त्रक्रिया अशा विविध उपचार व सुविधा उपलब्ध आहेत.

ग्रामीण भागात आरोग्यसेवा ही आजही अनेकांसाठी आव्हानात्मक बाब मानली जाते. मात्र सेवा हीच खरी पूजा या भावनेतून सुरू झालेल्या अकोले हॉस्पिटलने या समजुतीला न्याय देत चार वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण केला आहे. विशेष म्हणजे हा वर्धापन दिन अक्षय तृतीया या पवित्र दिवशी साजरा होत



असल्याने या दिवसाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

अक्षय तृतीया हा नव्या सुरुवातीचा, सतत वृद्धिंगत होणाऱ्या पुण्याचा आणि सकारात्मक ऊर्जेचा प्रतीक मानला जातो. याच दिवशी सुरू झालेल्या या रुग्णालयाने ग्रामीण जनतेला परवडणारी, दर्जेदार आणि विश्वासार्ह आरोग्यसेवा देण्याचा संकल्प केला आणि त्या दिशेने सातत्याने वाटचाल केली आहे.

रुग्णालयाची स्थापना ही केवळ व्यवसायिक दृष्टीकोनातून नव्हे तर समाजसेवेच्या भावनेतून करण्यात आली. सुरुवातीच्या काळात अनेक अडचणींना सामोरे जावे लागले, परंतु चिकाटी, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यांच्या जोरावर या रुग्णालयाने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. आज चार वर्षांत हजारो रुग्णांनी येथे उपचार घेतले असून, हे रुग्णालय त्यांच्या विश्वासाचे केंद्र बनले आहे.

या रुग्णालयात अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांसह सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. २४ तास सेवा, आपत्कालीन उपचार, आयसीयू, प्रसूती विभाग, बालरोग सेवा, मेडिसिन विभाग, सर्जरी विभाग तसेच इतर विविध सुविधा येथे उपलब्ध आहेत. रुग्णांच्या सेवेसाठी म्ब्युलन्स सेवा देखील तत्परतेने कार्यरत आहे. या यशामागे तज्ञ डॉक्टरांची अनुभवी टीम तसेच सेवाभावी परिचारिका व कर्मचारी यांचा मोठा वाटा आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक रुग्णाची काळजी कुटुंबातील सदस्याप्रमाणे घेतली जाते. रुग्णांशी आत्मीयतेने वागून त्यांना मानसिक आधार देण्याचे कार्यही सातत्याने केले जाते. अकोले मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून सचिव सौ. रूपाली वाकचौरे यांच्या संकल्पनेतून सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवले जात आहेत. मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, आरोग्य जनजागृती अभियान, शालेय विद्यार्थ्यांची तपासणी, विधवा महिलांची तपासणी, वृक्षारोपण तसेच गरजू रुग्णांना आर्थिक मदत अशा अनेक उपक्रमांद्वारे समाजाशी असलेले नाते अधिक दृढ



करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील अनेक रुग्णांसाठी अकोले हॉस्पिटल हे आशेचा किरण ठरले आहे. वेळेवर मिळालेल्या उपचारांमुळे अनेकांचे जीव वाचले असून, महिलांसाठी व बालकांसाठी विशेष सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांचा विश्वास दिवसेंदिवस अधिक दृढ होत आहे.

वर्धापन दिनानिमित्त अक्षय तृतीयेच्या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मोफत आरोग्य शिबिर तसेच बांधकाम कामगारांसाठी विशेष शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये डॉक्टर व कर्मचारी यांचा सन्मान तसेच समाजोपयोगी उपक्रमांचा समावेश असेल.

अकोले हॉस्पिटलमध्ये नोंदणीकृत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी बांधकाम योजनेअंतर्गत हर्निया, मुळव्याध, गर्भपिशवीचे ऑपरेशन, स्त्रियांचे आजार, हाडांचे ऑपरेशन इत्यादी शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध आहेत. यासाठी बांधकाम कार्ड, आधार कार्ड व शिधापत्रिका इत्यादी कागदपत्र आवश्यक आहे. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सुरू असून, या अंतर्गत २३९९ उपचार व शस्त्रक्रिया तसेच प्रत्येक कुटुंबाला प्रतिवर्ष ५ लाखांपर्यंत आरोग्य संरक्षण दिले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शिधापत्रिका, आयुष्यमान कार्ड व आधार कार्ड आवश्यक आहे. मुख्यमंत्री सहायता निधीची सुविधा देखील अकोले हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असून यामध्ये बारा वर्षाच्या आतील मुलांचे ऑपरेशन, सांधा बदल शस्त्रक्रियेसाठी अर्थसहाय्य, त्यासाठी आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला व शिधापत्रिका आवश्यक आहेत.

सर्व कंपन्यांच्या कॅशलेस व रिइम्बर्समेंट सुविधा येथे उपलब्ध आहेत. या हॉस्पिटलमध्ये आतापर्यंत शेकडो शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या आहेत. भविष्यात अधिक आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे, नवीन वैद्यकीय विभाग सुरू करणे आणि ग्रामीण भागातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करणे हा रुग्णालयाचा ध्यास आहे. सेवा, विश्वास आणि गुणवत्ता या त्रिसूत्रीवर आधारित



अकोले हॉस्पिटलने चार वर्षांचा टप्पा यशस्वीरित्या पार केला असून, पुढील काळातही रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा या भावनेतून कार्यरत राहण्याचा संकल्प दृढ केला आहे.

**संकलन- संजय आहिरे**
**उपसंपादक, दैनिक युवावार्ता**





